VOL- X ISSUE- XI NOVEMBER 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# लातूर तालुक्यातील ग्रामनामे

**प्रा.डॉ.प्रमोद लक्ष्मणराव चव्हाण**
जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालय, लातूर
Email-chavanpramod75@gmail.com

प्राचीन काळापासून मानवाने आपल्या गरजा पूर्ण करू शकणाऱ्या नद्या व जलाशयाच्या सभोताली मानवी वसाहती केल्या अशा वसाहतींचा (स्थलनामाचा) अभ्यास हा त्या क्षेत्रातील प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरेचा व समृद्ध एहिक जीवनाच्या ऐतिहासिक खुणांचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरतो.(1) ग्रामनामांच्या उत्पत्तिशास्त्राच्या दृष्टीने विचार केला व उपलब्ध अभिलेखातून त्यांच्या नोंदी पडताळल्या की स्थानाचे प्राचीनत्व स्पष्ट होत जाते. तसेच पुरातत्वीय व अभिलेखीय पुरावे या परिसरातील स्थळाचे प्रारंभिक ऐतिहासिक काळापासून आजपर्यंत असलेले समृद्ध जीवनाचे सातत्य स्पष्ट करण्याचा प्रयत्न आनेक विद्वानानी केला आहे. स्फुट स्वरूपात म्हणता येईल असे परंतु मूलगामी स्वरूपाचे काम पा. वा. काणे, वी. का. राजवाडे तसेच वा. वी. मिराशी, सुमती मुळे व हरिहर ठोसर इत्यादिनी स्थलनाम अथवा ग्राम नामाच्या क्षेत्रात संशोधनरूपी कार्य केले आहे. या विद्वानांनी गतकालीन शिलालेख व ताम्रपटातील नोंदीचा अभ्यास करून त्यातून व्यक्त होणारी स्थलनामे अथवा ग्रामनामे व त्यांचा भौगोलिक व सांस्कृतिक संदर्भ लाऊन त्या विषयावर प्रकाश टाकण्याचे अनमोल कार्य केले आहे. निसर्गदत्त समृद्धीमुळे विविध राजवंशांना एखाद्या परिसराचे आकर्षण कसे होते ते राष्ट्रकुटापासुन यादव काळापर्यंतच्या अभिलेखात आलेल्या स्थलनामांच्या नोंदी हीच बाब स्पष्ट करतात.

व्यक्तीनामापेक्षा कुटुंबनामे व विशेषता आडनाव किंवा कुटुंब नामापेक्षाही ग्रामनाम अधिक जुने असते. गावाच्या निर्मितीच्या वेळी लोक आपली भाषा संस्कृतीचे प्रतिबिंब असलेले गाव, ग्राम नाम म्हणून ठेवतात व त्यामुळे ग्राम नामाच्या अभ्यासातून विशिष्ट भागाची भाषा आणि संस्कृती याविषयी ओळख होऊ शकते. अर्थात ही ग्रामनामे मूळ स्वरूपात विचारात घ्यावी लागतात व अशी मूळ स्वरूप प्राचीन अभिलेखात आढळतात. तसेच प्राचीन वाङ्मयातूनही मिळतात. अर्थात त्यासाठी योग्य निरीक्षण व्हावे लागते एखाद्या प्रदेशातील व्यक्तिनामे कुलनामे तपासून पाहणेही उद्बोधक ठरते. असाच प्रयत्न मांजरा नदीच्या खोऱ्यात वसलेल्या लातूर तालुक्याच्या संदर्भात इथे केला आहे. लातूर जिल्ह्यात एकूण 986 ग्रामनामे आहेत त्यापैकी लातूर तालुक्यात अस्तित्वात असलेल्या 123 ग्रामनामांचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.(2)

**लातूर ग्रामनामाची उत्पत्ती :**

मांजरा व तावरजा नद्यांच्या खोऱ्यात हे प्राचीन नगर वसलेले आहे या नगराची प्राचीनता स्पष्ट करणारे पुरावे इसवीसनाच्या सहाव्या शतकापासून उपलब्ध झाली आहेत (3) लातूर हे ग्रामनाम राष्ट्रकूट काळात राष्ट्रकूटांच्या शिलालेख, ताम्रपटात रट्टनौर या नावाने उल्लेखित होते. याचे प्राचीन संदर्भ कन्नड, संस्कृत व मराठी शिलालेखामधूनही प्राप्त होतात. हे शिलालेख कासारवडवली, गणेशवाडी, लातूर, औसा, रेणापूर, कानेगाव आदी ठिकाणी प्राप्त झाले आहे. निळगुंद, शिरूर, सौदत्ती तेथील शिलालेखात लातुरचे प्राचीन नाव 'लत्तलूर' असे नोंदवले आहे. तेरदाळ लेखात 'लत्तनूर' आसा शब्द योजलेला आहे. सिताबर्डी नागपूर येथील शिलालेखात लातूरचे 'लत्तलौर' असे रूप योजले आहे.

सदरील लेख विक्रमादित्य सहावा याच्या राजवटीत कोरलेला आहे. डॉ फ्लिट यांनी 'लत्तलूर' म्हणजे छत्तीसगढमधील 'रत्नापूर' असे म्हटले होते परंतु संशोधनाअंती त्यांनी आपले मत बदलून मराठवाड्यातील लातूर हेच पूर्वीचे 'लत्तलूर' होय असे मत व्यक्त केले.या प्राचीन नगरीचे नाव 'रत्नापूर महात्मे' या पोथीत विस्ताराने आढळते. (4) लातूरचे प्राचीन नाव रत्नापूर व ती ताम्रध्वज राजाची राजधानी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याच ग्रंथात लातनूर असाही उल्लेख आला आहे.या स्थलनामांची व्युत्पत्ती रट्ट किंवा राष्ट्रकूट राजवंशाच्या नावाशी निगडित आहे. आसे मत कै. ग.ह. खरे यानी मांडले आहे.राष्ट्रकूट राजा तिसऱ्या गोविंदाने लातूरजवळील मोरखंडी येथे राजधानी हलवल्यानंतर त्याचा व युवराज अमोघवर्षाचा या नगराशी संपर्क वाढत गेला असावा व हे ग्रामाचे 'पूर' बनले असावे. अमोघवर्षाची बहुधा ही निवासी राजधानी असावी. रत्नापूर महात्म्यातील ताम्रध्वज म्हणजे हां अमोघवर्ष असावा. राष्ट्रकुट राजे स्वतःस लत्तलूरपूरवराधीश, लत्तलूरपुरपरमेश्वर, लत्तलूर पुरवराधीश्वर अशी बिरुदे लावली. राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष याचा नामोल्लेखही याच बिरुदांनी लत्तलूर सम्राट या आर्थिक केला गेला आहे. राजगादी गेल्यानंतरही अमोघवर्ष काही वर्षा लातूरमध्ये राहिला असावा व त्यामुळे त्याला प्रथम हे बिरुद लावले गेले असावे असे डॉ. ठोसर यांचे मत आहे सैद महमद यांच्या कल्पसमूह नावाचा वैद्यकीय ग्रंथामध्ये लातूर चे ग्रामनाम 'लातनूर' असे आले आहे.(5)

**लातूर जिल्ह्यातील ग्रामनामे :**

एकूणच महाराष्ट्रातील वसाहतींचा विचार करीत असताना पूर, गाव, नगर, वाडी प्रत्येय लावून ग्रामनामे तयार झालेली दिसतात. तसेच संस्कृत, मराठी भाषेबरोबरच कन्नड भाषेचा व उत्तरकालीन ग्राम नामावर फारसी भाषेचा प्रभाव ज़ाणवतो.(6)

**भोगोलिक वैशिष्ट्य स्पष्ट करणारी ग्रामनामे :**

दगडवाडी, भोईसमुद्रगा, महापूर, खाडगाव, चिखल ठाणा, वाकडी यावरुन खडक, दगड, वळन, समुद्र(7) अशी भौगोलिक वैशिष्ट्ये स्पष्ट करणारे नावे महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात आहेत तीच परंपरा जतन करण्याचे काम लातूर तालुक्यातील स्थलनामानी केले आहे.

**पाण्याशी संबंधित नावे :**

गंगापूर, भुईसमुद्रगा, कासारखेडा, कासारगाव, कासार जवळा, अशी पाण्याच्या अनुषंगाने काही ग्रामनामे आली आहेत. सतत वाहणाऱ्या प्रवाहाला गंगा म्हणण्याचा प्रघात आहे. कासार म्हणजे तालाव किंवा जलाशय. **महापूर या** नावावरून गोदावरी नदीची उपनदी असलेली मांजरा या नदीला सतत पूर येत असावा. याशिवाय परिसरात असलेले लहान मोठे ओहोळ त्यांना अडवून निर्माण झालेले जलाशय ही वस्तीची गरज भागविणारे असत.परंतु पाण्याशी निगडित ग्रामनामे लातूर तालुक्यात फारसे आढळून येत नाहीत.

**वनस्पतीपासून रूढ झालेली ग्रामनामे:**

चिंचोली, चिंचोली राववाडी, तांदुळजा, तांदूळवाडी, पिंपरी आंबा, गांजूर, पिंपळगाव, बाभुळगाव, बोरी, बोरगाव, बोरवटी, बोरगाव, (कानाडी) रुई, शिरसी, भातखेडा, भातांगळी, धानुरी, धनेगाव, अशाप्रकारे पिंपळ, चिंच, बोर, आंबा, शिरस (8) असे विशाल वृक्ष असलेली व दीर्घकाळ टिकणारे वृक्षाचे अस्तित्व आजही अपनास दिसून येते. तांदूळ किंवा धान शिवाय दैनंदिन आहारातील तृणधान्यावरून अनेक ग्रामनामे आहेत. उपरोक्त स्थल नामाचा विचार करता या परिसरातील वनसंपदेची ओळख आपनास होते. या ग्रामनामाची संख्या विचारात घेता येथे मोठ्या प्रमाणात वृक्ष राजी असल्याचे स्पष्ट होते. उपरोक्त ग्रामनामावरून लातूर तालुक्यातील विविध प्रकारचा वनसंपदेचे मुबलक अस्तित्व असावे जेणेकरून वर्तमान स्थितीत भविष्याचा वेध घेताना संबंधित वृक्षराजी झी लागवड येथे केली तर

ते निसर्गाला व मानवालाही त्याच्या विकासासाठी अनुकूल ठरेल.

**देवतेशी संबंधित ग्रामनामे :**

हनुमंतवाडी, शिवूर, शिवनी, रामेश्वर, रामेगाव, श्रीरामनगर, चांडेश्वर, सेवादासनगर, साई, नीलकंठ या ग्रामनामावरून असे दिसते की शिव देवतेला समर्पित असलेली ग्रामनामे येथे आहेत.(9) तसेच प्रभुरामचंद्राशी संबंधित असलेलीही ग्रामनामे आहेत याशिवाय स्थानिक ग्रामदेवता वरून सुद्धा ग्रामनाम असल्याचे दिसून येते. यावरुन येथिल समाजात कोणत्या पंथाचा, धर्माचा प्रभाव होता ते दिसून येते.

**लोक नामाशी संबंधित ग्रामनामे :**

लोक नामाशी संबंधित ग्रामनामे बामनी, भोईसमुद्रगा, भोयरा सेवादासनगर आदी. यामध्ये बामणी आशा ग्राम नामामध्ये संबंधित गाँव एखाद्या ब्राह्मणास राजाकडून मिळालेल्या आग्रहामुळे वसलेले असू शकते. यादवकाळात अशी प्राचीन अग्रहार मोठ्या प्रमाणात दिल्याची नोंद उपलब्ध होते. (10) यावरून त्या गावचे प्राचीनत्व लक्षात येते. याशिवाय कासार या लोक नामावरुन त्यांचे यापरिसरात मोठ्या प्रमाणात अस्तित्व असल्याचे दिसून येते. तसेच भोई यांची गावगाडा चालविण्यासाठी स्वतंत्र वसाहत असावी त्यामुळे अशी ग्रामनामे लक्षणीय आहेत.

**प्राणी पक्ष्यांपासून सुरू झालेली नावे :**

सारसा, वाघोली, मांजरी, पाखरसांगवी, नीलकंठ, नागझरी इत्यादी ग्रामनामावरून यापरिसरात उपरोक्त प्राण्यांचे अथवा पक्षांचे अस्तित्व असावे असे वाटते. यातील काही प्राणी अथवा पक्षी हे वन्य प्राणी आहे म्हणजेच त्यांना अनुकूल असलेली वनसंपदा, तिचे अस्तित्व या परिसरात असल्याशिवाय ते येथे राहू शकत नाही. यावरून आपणास येथील वनसंपदेची कल्पना येते.

**गाव प्रत्येक असलेली ग्रामनामे :**

लातूर तालुक्यात गाव प्रत्यय लागलेली ग्रामनामे इतर प्रकारच्या ग्राम नामापेक्षाही जास्त प्रमाणात आढळून आली आहेत. सामनगाव, वासनगाव, भडगाव, बोरगाव, बोकनगाव, बाभुळगाव पिंपळगाव, नांदगाव धनेगाव, दिंडेगाव, टाकळगाव, गोंदेगाव, गातेगाव, खोपेगाव, खाडगाव, कासारगाव, काटगाव, बोरगाव, रामेगाव, सावरगाव अशा प्रकारे गाव नावाचा प्रत्येक लावलेले महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभरामध्ये मोठ्याप्रमाणात ग्रामनामे अस्तित्वात आहेत. लातूर तालुक्यातील 123 गावांपैकी 20 गावे, गाव प्रत्यय लावलेली आढळून आली. (11)

**वाडी प्रत्यय असलेली ग्रामनामे :** लातूर तालुक्यात वाडी प्रत्यय असणारी गावे उदा० रायवाडी, दगडवाडी, तांदूळवाडी, चिंचोली रावबाडी, गुंफावाडी अशी आहेत. वाडी म्हणजे मानवी वसाहतीची छोटी वस्ती याअर्थाने लातूर तालुक्यातही अशा प्रकारच्या वस्ती अस्तित्वात होते असे दिसून येते.

**पूर प्रत्यय असलेली ग्रामनामे**: लातूर तालुक्यात सिकंदरपुर, बसवंतपूर, गंगापूर, खंडापूर, खुलगापूर, कातपुर, रमझानपुर, ममदापूर, अशी पूर प्रत्यय असलेली ग्रामनामे आढळून आली आहेत. पूर या शब्दाचे मराठीत दोन अर्थ आहे जोराचा पाऊस पडल्यानंतर किंवा धरणाचे पाणी मोठ्या प्रमाणात नदीत सोडल्यानंतर येणारा पूर व प्राचीन काळापासून पूर म्हणजे मोठे गाव या अर्थानेही पूर हे प्रत्यय ग्राम नामामध्ये सम्पूर्ण महाराष्ट्रामध्ये वापरला जातो. तसा तो लातूर तालुक्यातही पूर हां प्रत्यय लावलेली ग्रामनामे आढळून आली आहेत.

**इस्लामी ग्रामनामे :** मध्ययुगीन कालखंडामध्ये इस्लामी राजसत्तेच्या प्रभावातून पारंपारिक ग्राम नामामध्ये बदल करत इस्लामी परंपरेतील ग्रामनामे वसाहतींना दिली गेली. उदा. महमदापुर, मुशिराबाद, रमझानपुर, सिकंदरपूर, खुलगापूर या ग्रामनामावरून या परिसरात इस्लामी राजवटीचा प्रभाव असल्याचे निदर्शनास येते.(12)

**पेठ** म्हणजे बाजारपेठ होय. मध्ययुगीन काळापासून महाराष्ट्रामध्ये ज्या गावात मोठ्या प्रमाणात व्यापार

चालतो, वस्तूंची देवाणघेवाण केली जाते त्या ग्रामनामाला पेठ या नावाने ओळखले जाते. अशा प्रकारे बाज़ारपेठेची वैशिष्ट्ये सांगणारे पेठ नावाचे एक ग्रामनाम लातूर तालुक्यात आहे.

मांजरा नदीच्या खोऱ्यात वसलेल्या लातूर जिल्ह्यातील ग्रामनामांचा अथवा स्थलनामांचा अभ्यास हा या खोऱ्यात नैसर्गीक परंपरेने समृध्द असलेल्या भोगोलिक वैशिष्ट्यांचा आणि वनसंपदेच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो.आजच्या विकास कार्यक्रमासाठी परिसरातील पर्यावरणाची पुरेशी जाण असणे आवश्यक ठरते. उपलब्ध जीवसृष्टी व निसर्गता विकसित असलेली वनसंपदा यांचा जाणीवपूर्वक शोध घेऊन त्यांचा समतोल साधत यातील मानवसमुहाच्या विकासाच्या दृष्टीने हितकारक आशा निसर्गानुकूल वनसंपदेची जोपासना करणे हे केव्हाही उपकारक ठरणार आहे. गावातील विशिष्ट वृक्षांच्या प्राबल्यामुळे त्या स्थानास नाव प्राप्त होते असे काही स्थलनामाच्या अभ्यासातून स्पष्ट होते. येथील रूढ असलेली ग्रामनामे विचारात घेता त्यातील काही झाडांना परंपरेने धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वही आहे, म्हणून त्याचीच लागवड मोठ्या प्रमाणात झाली तर ही वनसंपदाच्या विकासाच्या दृष्टीने अधिक सोपे व अनुकूल होऊ शकेल. म्हणून येथे मुळात असलेल्या भोगोलिक वैशिष्ट्यांचा शोध घेऊन त्यांचा उपयोग समृद्ध मानवी जीवनासाठी करणे महत्त्वाचे ठरते. याद्दष्टीने लातूर जिल्ह्यातील ग्रामनामाचा जाणीवपूर्वक अभ्यास करण्याचा प्रयत्न या उपक्रमात केला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. डॉ अरुणचंद्र पाठक, स्थानपोथी : एक पुरातत्त्वीय अभ्यास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2013, पृष्ठ. 26
2. डॉ. जयद्रथ जाधव, (संपादित) लातूर वसा आणि वारसा, अरुणा प्रकाशन, लातूर 2017, पृ.78
3. जोशी सु.ग.,लातूर ग्रामनामाचा शोध, निवडक शोधनिबंध, खंड 05, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, 2000, पृष्ठ 147
4. सु.ग.जोशी, (संपादित) लातूर चा इतिहास आणि रत्नापूर महात्मे मराठवाडा संशोधन मंडळ लातूर 2008 पृष्ठ 21
5. बा. ना. मुंडी, (संपा.) कल्पसमूह, पुणे, 1988, पृ. 20
6. डॉ अरुणचंद्र पाठक, (संपादित) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर- प्रवरा खोरे, दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 2013 पृ. 124
7. डॉ अरुणचंद्र पाठक, (संपादित) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर लातूर जिल्हा, भाग-2 ददर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 2008 पृ. 362-380
8. कित्ता- पृ. 362-380
9. कित्ता- पृ. 362-380
10. डॉ अरुणचंद्र पाठक, (संपादित) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर- प्रवरा खोरे, दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 2013 पृ. 129
11. डॉ अरुणचंद्र पाठक, (संपादित) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर लातूर जिल्हा, भाग-2 ददर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 2008 पृ. 362-380
12. डॉ. जयद्रथ जाधव, (संपादित) लातूर वसा आणि वारसा, अरुणा प्रकाशन, लातूर 2017, पृ. 96-97